**ठळक बातम्या**

- AI च्या मदतीने अन्न सुरक्षा, हवामानबदल या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता वाढवण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्य शिक्षण मंडळाच्या १०वीच्या परीक्षेला प्रारंभ

- भिवंडी- निजामपूर महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपा बंडखोर नारायण चौधरी यांची निवड

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतले सुपर एट संघांचे सामने उद्यापासून रंगणार

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, भारताची आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात धडक

**<><><><><>**

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या म्हणजेच AI च्या सहाय्याने अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट -२०२६ मधे 'एआय इन ॲग्रीकल्चर' या विषयावरच्या चर्चासत्रात ते बोलत होते.

सध्या जगभरात शेतीसमोर अनेक आव्हानं आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षेवर ताण आला आहे. अशा परिस्थितीत AI महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असं मत मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केलं. राज्य सरकारनं महाॲग्री एआय धोरणाअंतर्गत विकसित केलेल्या मोबाईल मंचावर शेतकऱ्यांना व्यक्तिगतरित्या सल्ला उपलब्ध आहे. त्याला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद असल्याचं ते म्हणाले. या सत्रानंतर वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले,

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस**

महाविस्तार ॲप ला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, यामध्ये आणखी वाढ होईल अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. ते म्हणाले,

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

या परिषदेच्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी जागतिक बँकेचे दक्षिण आशिया विभागाचे उपाध्यक्ष योहानिस त्सुट यांच्याशी चर्चा केली. यावेळी कृषी क्षेत्रात डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सेवा मजबूत करणं, रोजगारनिर्मिती वाढवणं आणि तरुणांना शाश्वत रोजगारासाठी आवश्यक डिजिटल कौशल्यांचं प्रशिक्षण, या मुद्द्यांवर चर्चा झाली.

**<><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार पॅक्स सिलिकाचं सदस्यत्व भारताने स्वीकारलं आहे. एआय इम्पॅक्ट परिषदेत या कारारवर स्वाक्षऱ्या झाल्या. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

भारत आणि अमेरिका यांच्यातल्या व्यापार करारावर मार्चमध्ये स्वाक्षरी होण्याची शक्यता असून येत्या एप्रिलपासून तो लागू होईल, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं आहे. भारताचे ब्रिटन आणि ओमानबरोबरचे मुक्त व्यापार करारही एप्रिलपासूनच लागू होण्याची शक्यता गोयल यांनी व्यक्त केली आहे. न्यूझीलंडबरोबरचा करार सप्टेंबरमध्ये लागू होईल. भारत अमेरिका दरम्यानच्या कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप देण्यासाठी दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये येत्या सोमवारी अमेरिकेत बैठक होणार आहे.

**<><><><>**

राज्य शिक्षण मंडळाच्या १०च्या परीक्षेला आज सुरुवात झाली. ९ विभागीय मंडळांमधून मिळून १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थी या परीक्षेला बसले आहेत. राज्यभरात एकूण ५ हजार १११ केंद्र असून कॉपीसह इतर गैरप्रकार रोखण्याकरता विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. पोलीस दलाची भरारी पथकं तैनात असून ड्रोनमार्फतही परीक्षा केंद्रावर लक्ष ठेवण्यात येत आहे.

दरम्यान, मंडळाने संकेतस्थळावर जाहीर केलेलं अधिकृत वेळापत्रकच ग्राह्य धरावं असं आवाहन राज्य शिक्षण मंडळाने केलं आहे. परीक्षा १८ मार्चपर्यंत चालेल.

**<><><><>**

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेचे महापौर म्हणून भाजपातून फुटून बाहेर पडलेले नारायण चौधरी यांची निवड झाली आहे. उपमहापौर पदी काँग्रेसचे मोमीन तारिक अब्दुल वारी यांची निवड झाली आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि भाजपातून बाहेर पडलेले ९ नगरसेवक यांनी एकत्र येऊन भिवंडी सेक्युलर आघाडी स्थापन केली होती.

<><><><>

विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या सोमवारी २३ तारखेपासून मुंबईत सुरु होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर करतील. अजित पवार यांच्या निधनानंतर मुख्यमंत्र्यांनी अर्थखातं स्वतःकडे ठेवलं असून ९ कोटी रुपयांच्या तुटीचं आव्हान अर्थसंकल्पासमोर आहे. राज्यपालांच्या अभिभाषणानं अधिवेशनाची सुरुवात होणार असून त्यानंतर माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव सादर होईल.

<><><><>

'जी राम जी' अर्थात विकसित भारत रोजगार आणि उपजिविका हमी अभियान ग्रामीण योजनेअंतर्गत केंद्रसरकारने राज्याला तीन कोटी वाढीव मनुष्य दिवसांच्या तरतुदीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली. या निर्णयाबद्दल फडणवीस यांनी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांचे आभार मानले. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी घेतलेल्या या निर्णयामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असून, ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळेल. विशेषतः अकुशल कामगारांच्या उपजीविकेला भक्कम आधार मिळेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><>

ठाणे जिल्हा हे मोबिलिटी हब आणि कल्याण शहर हे भविष्यातलं शहरी केंद्र म्हणून विकसित केलं जाईल, अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीएका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.  ठाणे शहरासाठी १२ ते १३ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. ठाणे-बोरिवली जुळ्या बोगद्याच्या प्रकल्पासाठी १८ हजार ८३८ कोटी रुपयांच्या तरतुदीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. ठाणे किनारी मार्गाच्या पहिल्या

टप्प्यासाठी १ हजार २५ कोटी तर आनंदनगर ते साकेत उन्नत मार्गासाठी ८८० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. कल्याण-डोंबिवली प्रदेशाचा मोठा विस्तार करण्याचं प्रयोजन असून वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी कल्याण रिंग रोड प्रकल्पाला ६०० कोटी रुपयांची तरतूद केल्याचंही या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने उद्यापासून सुरु होतील. पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड दरम्यान कोलंबो इथं होईल. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

भारत, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड,श्रीलंका, न्यूझीलंड, झिंबाब्वे, आणि पाकिस्तान हे देश सुपर एटमधे पोहोचले आहेत. भारताचा सामना येत्या रविवारी दक्षिण आफ्रिकेबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर होणार आहे.

सुपर एट फेरीत न पोहोचलेले ऑस्ट्रेलिया आणि ओमान यांच्यातला सामना श्रीलंकेत पल्लिकल इथं आज होईल.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, भारतानं आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवलं आहे. आज बँकॉक इथं झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ५ गडी राखून दणदणीत विजय मिळवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या श्रीलंकेचा डाव २ चेंडू बाकी असतानाच ११८ धावात आटोपला. भारतातर्फे कर्णधार राधा यादवनं ४, तर तनुजा कंवर आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी २ बळी मिळवले. त्यानंतर भारतानं ११९ धावांचं विजयी लक्ष्य ५ गड्यांच्या मोबदल्यात १४ व्या षटकातच पूर्ण केलं.

राधा यादवनं नाबाद ३१ धावा करत फलंदाजीतही मोलाचं योगदान दिलं. ती सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

<><><><><>

मुंबईतल्या वाकोला परिसरात स्वयंपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन चौघे जण होरपळल्याची घटना घडली. काल रात्री झालेल्या या घटनेत एक

वृद्ध आणि एका मुलासह दोन महिला होरपळल्या आहेत. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिस आणि अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून आग विझवली.

**//<><><><><>//**